




दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २२६ ●शनिवार,दि.१५ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


## पेट्रोल-डिझेलवर चालानाऱ्या आलिशान गाड्या टप्प्याटप्प्याने बंद करा; सुप्रीम कोर्टाची महत्वपूर्ण सूचना

**मुंबई । प्रतिनिधी**

देशातील विविध महानगरांमध्ये वाढते प्रदूषण चिंतेचा विषय बनले आहे. याच पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने महत्वपूर्ण सूचना केली आहे. देशातील रस्त्यांवर इलेक्ट्रिक वाहनांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्याचे समर्थन न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठाने केले. याचवेळी पेट्रोल आणि डिझेलवर चालणाऱ्या उच्च दर्जाच्या अलिशान गाड्यांचा वापर टप्प्याटप्प्याने बंद करण्याची सूचना खंडपीठाने केली आहे.

आजकाल बाजारात मोठ्या इलेक्ट्रिक वाहनेदेखील उपलब्ध आहेत. त्यामुळे समान आकाराच्या अंतर्गत ज्वलन इंजिन (आयसीई) वाहनांवर टप्प्याटप्प्याने बंदी घालता येईल,



**● इलेक्ट्रिक वाहनांची खरेदी आणि वापराला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारच्या धोरणांची अंमलबजावणी करण्याची मागणी याचिकेतून केली आहे. त्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी सुनावणी घेतली.**

असे खंडपीठाने म्हटले. सर्वात आधी अतिशय उच्च दर्जाच्या वाहनांवर बंदी घालण्याचा विचार करा. त्याचा सामान्य माणसावर कोणताही परिणाम होणार नाही. कारण देशातील खूप कमी लोकसंख्येला उच्च दर्जाच्या अलिशान गाड्या परवडू शकतात, अशी टिप्पणी न्यायमूर्ती कांत यांनी केली.

सुनावणीवेळी केंद्र सरकारतर्फे ॲटर्नी जनरल आर. वेंकटरमणी यांनी बाजू मांडली. सरकार न्यायालयाच्या अशा भूमिकेला पाठिंबा देऊ शकते, असे म्हणणे वेंकटरमणी यांनी यावेळी मांडले. इलेक्ट्रिक वाहनांच्या जाहिरातीशी संबंधित १३ मंत्रालये या प्रकरणात सहभागी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुरुवातीला इलेक्ट्रिक वाहनांची किंमत जास्त होती. नंतर त्यांचा वापर वाढण्याच्या हेतूने सरकारकडून प्रोत्साहन दिले जात आहे. मात्र आता पुरेसे चार्जिंग पॉईंट्स नाहीत हा एक अडथळा आहे, असे ज्येष्ठ वकिल प्रशांत भूषण यांनी खंडपीठाला सांगितले.

## पहिल्या पत्नीच्या मदतीने दुसऱ्या पत्नीवर गोळीबार, फरार पती पुन्हा तिलाच भेटायला येताच अटकेत

**बीड । प्रतिनिधी**

किरकोळ वादातून दुसऱ्या बायकोवर गोळी झाडली. त्यानंतर फरार होत तीन महिने घरफोड्या केल्या. पुन्हा तिलाच जेवणाचे पार्सल घेऊन भेटायला जात असतानाच कुख्यात गुन्हेगाराला हॉटेलवर सापळा रचून सिनेस्टाईल बेड्या ठोकण्यात आल्या. त्याच्याकडून पाच गुन्हे उघड झाले असून साडेचार लाख रुपयांचे दागिने जप्त केले आहेत. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने शुक्रवारी केली. संदीप्या ईश्वऱ्या भोसले (वय ३०, रा. बेलगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर, ह.मु. खामगाव, ता. गेवराई) असे पकडलेल्या कुख्यात गुन्हेगाराचे नाव आहे. संदीप्याला पहिली मटक नावाची



बायको आहे, ती बेलगाव येथे राहते. साधारण चार महिन्यांपूर्वी मटक, तिचा भाऊ आणि संदीप्या हे दुसरी बायको शीतलकडे खामगावला आले होते. त्यांच्यात चोरीच्या साहित्याच्या वाटपावरून वाद झाला. यात गोळीबार झाला आणि शीतलच्या कमरेत गोळी लागून ती गंभीर जखमी झाली. याप्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. जेवणाचे पार्सल अन् ▶ उर्वरित पान २ वर

## जननेता आपल्या, हक्काचा माणूस म्हणून शिवसेनेचा ढाण्या वाघ

### हरिभाऊ शेळके यांची ढेकनमोहा पंचायत समिती गणात सर्वसामान्य जनतेत चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

सध्या ढेकनमोहा पंचायत समिती गणामध्ये एकाच नावाची चर्चा आहे, हरिभाऊ शेळके शिंदे साहेबांचा धनुष्यबाण हाती घेऊन कामाला सुरुवात करणाऱ्या सर्व सामान्य नागरिकांच्या समस्या सोडवनाऱ्या युवकांमध्ये एकच नावाची चर्चा आहे आज पर्यंत नाळवंडी सर्कल मध्ये बाणाची क्रेज राहिलेली आहे, हरिभाऊ शेळके यांच्या मागे युवकांची आणि ज्येष्ठांची मोठी फौज तैनात आहे. त्यामुळे कोणीही ताकद लावली तरी हरिभाऊ शेळके यांचा धनुष्यबाण या चिन्हाचा विजय नक्कीच होणार असेल्याचे जनसन्यांमध्ये बोलले जात आहे.

बीड तालुक्यातील ढेकनमोहा पंचायत समिती गानामधून हरिभाऊ शेळके यांनी निवडणूक लढवावी अशी मागणी सर्वसामान्य जनतेनी केली आहे.



कारण नेतृत्व आणि दातृत्वाचा सुंदर संगम असलेल्या हरिभाऊ शेळके यांनी आपल्या कार्यातून जनतेच्या मनात वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेल्या १५ वर्षांपासून समाजकार्यात सक्रिय असलेल्या हरिभाऊ शेळके यांनी वांगी, शिवणी, ▶▶ उर्वरित पान २ वर

**● मुत्सदी नेतृत्वाची झलक – ढेकनमोहा पं. सं. गनातून आगामी निवडणुकीत शिंदे सेने मधून त्यांना उमेदवारी फिक्स झाल्याने कार्यकर्ते कामाला लागले आहेत. त्यांचे समाजाभिमुख कार्य, नेतृत्वगुण आणि सर्वसमावेशक दृष्टी यामुळे ते जनतेच्या मनातील उमेदवार ठरत आहेत.**

**● समाजसेवेचा ध्यास! हाच नागरिकांचा विश्वास – गोरगरिब विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, रुग्णांना औषधोपचारासाठी सहाय्य, तरुणांना उद्योजकतेकडे वळण्यासाठी प्रेरणा देणे, तसेच परिसरातील विविध सामाजिक प्रश्नांवर उपाययोजना करणे – हे त्यांच्या कार्याचे मुख्य वैशिष्ट्य राहिले आहे. पर्यावरण संवर्धन, रक्तदान, वृक्षारोपण, जलसंधारण आणि अन्नदान अशा विविध सामाजिक उपक्रमांमध्ये हरिभाऊ शेळके पाटील नेहमीच पुढाकार घेतात. स्वत: साठी नव्हे, समाजासाठी काहीतरी करायचं ही त्यांची विचारसरणी नागरिकांना भावते.**

**● जनतेचा नेता, हक्काचा माणूस – हरिभाऊ शेळके पाटील यांच्या साधेपणात आणि आपुलकीच्या स्वभावात एक आपलेपणा जाणवतो. संकटाच्या वेळी माझा माणूस आहे अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळेच त्यांच्या ढेकनमोहा पंचायत समिती गणात पं सं सदस्य म्हणून पदाच्या चर्चेला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे.**



*बीड : श्री. सुनील जाधव साहेब यांची पदोन्नतीने सहाय्यक निबंधक पाटोदा येथे निवड झाल्याबद्दल जिल्हा उपनिबंधक कार्यालय येथे त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देतांना दैनिक मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे, श्री. ठोसर साहेब, श्री. श्याम जाधव साहेब, श्री. विजय सावध साहेब यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.*

## बीडमध्ये वाळू माफियांची दादागिरी; जेसीबी अंगावर घालून तहसीलदारांना जिवे मारण्याचा प्रयत्न

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यात तहसीलदार वैशाली पाटील यांनी सीना नदीपात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्या माफियांवर मोठी कारवाई केली आहे. मात्र, कारवाईनंतर महसूल पथकातील कर्मचाऱ्यांना वाळू माफियांनी शिवीगाळ, धक्काबुक्की करत मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर घटना घडली आहे. तहसीलदार वैशाली पाटील यांना गुप्त बातमीदारांमार्फत सीना



नदीपात्रात संगमेश्वर मंदिराजवळ, हिंगणी येथे अवैध गौण खनिज व वाळू उपसा होत असल्याची माहिती मिळाली. त्यांनी तत्काळ पथकासह छापा टाकला. या कारवाईत महसूल पथकाने एक पिवळ्या रंगाचा जेसीबी, नंबर नसलेले तीन ट्रॅक्टर, एक ट्रॉली आणि घटनास्थळी साठवलेली ३० ब्रास वाळू, असा एकूण ५१ लाख ३ हजार ४०० किमतीचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला. पथकामध्ये तलाठी ▶ उर्वरित पान २ वर

## पालकांना सावध करणारी बातमी! तिसरीतील विद्यार्थ्यांकडून घृणास्पद प्रकार

**लातूर । प्रतिनिधी**

लहान मुलंही मोबाईलच्या आहारी गेले आहेत. आता अत्यावश्यक गरजांमध्ये मोबाईलचा समावेश आहे. मात्र मोबाईलमध्ये मुलं काय बघतात? त्यांचे काय सुरू आहे? यावर पालकांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे. लातूरमध्ये जी घटना घडली आहे, ती पालकांची चिंता वाढवणारी आहे. इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या दोन विद्यार्थांनी केलेला घृणास्पद प्रकारामुळं एकच गोंधळ उडाला आहे. तिसरीच्या वर्गात शिकणारा विद्यार्थी त्याचे वयच साधारण ८-९ वर्षे ▶ उर्वरित पान २ वर






## मराठा आंदोलक मनोज जरांगेंच्या हत्येचा कट; आरोपींची पोलीस कोठडीतून न्यायालयीनं कोठडीत रवानगी

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना आलेल्या जीवे मारण्याच्या धमकी प्रकरणी मोठी माहिती समोर आली आहे. जरांगे पाटील यांच्या घातपाताचा कट रचल्याच्या प्रकरणातील आरोपींची पोलीस कोठडीतून न्यायालयीनं कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. अणोल खुणे, दादा गरुड आणि कांचन साळवीला १४ दिवसांची न्यायालयीनं कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, जालन्यातील अंबड प्रथमवर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांच्या कोर्टात पोलिसांनी जरांगे पाटील यांच्या घातपाताचा कट रचल्याच्या प्रकरणातील आरोपींना हजर केले



होते. यावेळी न्यायालयानं त्यांना पोलिस कोठडीतून न्यायालयीनं कोठडी सुनावली आहे. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी दादा गरड आणि अमोल खुणे यांना अटक केली होती. त्यानंतर ११ नोव्हेंबरला रात्री उशीरा कांचन साळवी पोलिसांनी अटक केली होती. ▶ उर्वरित पान २ वर

## पत्रकार अनंत कलाल यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**गंगावाडी । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील पत्रकार अनंत कलाल यांचे गुरुवार रोजी मध्यरात्री दोन वाजण्तीवाजण्याच्या ▶ उर्वरित पान २ वर

## नवले पुलाच्या अपघातात एकाच कुटुंबातील ५ जणांचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्याच्या नवले पुलावर गुरुवारी संध्याकाळी भीषण अपघात झाला. या अपघातात दोन ट्रकच्या मधोमध एक कार सापडल्याने मोठा अपघात झाला. या अपघातात पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. यामध्ये तीन वर्षांच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कारमधील प्रवासी मयत स्वाती संतोष ▶ उर्वरित पान २ वर








# पंडित नेहरूंचे डिस्कवरी ऑफ इंडिया: भारतीयत्वाचा शोध आणि राष्ट्रनिर्मितीची दिशा

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी नेता आणि आधुनिक भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लिहिलेला डिस्कवरी ऑफ इंडिया हा ग्रंथ केवळ पुस्तक नाही, तर भारताच्या आत्म्याचा, इतिहासाचा आणि संस्कृतीचा सखोल शोध घेणारा एक विलक्षण विचारदस्तावेज आहे.१९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनानंतर नेहरू अहमदनगर किल्ल्यातील तुरुंगात असताना त्यांनी हा ग्रंथ लिहिला. बाहेर स्वातंत्र्याची लढाई पेटलेली असताना त्यांनी तुरुंगातून भारताचा व्यापक भूतकाळ आणि उज्ज्वल भविष्य यांचा विचारमंथनातून शोध घेतला.

डिस्कवरी ऑफ इंडिया हा प्रश्नांनी सुरू होणारा आणि उत्तरांच्या शोधात इतिहास, तत्त्वज्ञान, सांस्कृतिक परंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मिती यांचा प्रवास करणारा ग्रंथ आहे. भारतीयत्व म्हणजे काय? भारताचा आत्मा कसा घडला? विविधतेतून एकता कशी निर्माण झाली?- या प्रश्नांची उत्तरे नेहरू आपल्या ज्ञान, निरीक्षण आणि सांस्कृतिक जाणीवेतून देतात. त्यांच्या दृष्टीने भारत म्हणजे केवळ एक भूभाग नसून अनेक सहस्र वर्षांची सतरंजी आहे ज्यावर विविध संस्कृती, विचार, चळवळी आणि संघर्षांची नक्षी कोरली आहे. नेहरूंची लेखनशैली काव्यात्मक आणि चिंतनशील आहे.




ते भारताला एक प्राचीन आणि अजूनही जिवंत असलेली संस्कृती म्हणतात. वेद, उपनिषदे, बौद्ध- जैन विचार, सूफी-भक्ती परंपरा, गुप्त-मौर्य युग, मुगल काळ, वसाहतवादाचा परिणाम- या सर्वांचा त्यांनी सखोल अभ्यास करून भारतीय आत्म्याची उकल केली आहे. या ग्रंथात भारताच्या विविध सांस्कृतिक प्रवाहांमधील संवाद आणि संघर्ष दोन्हींचे चित्रण आहे. परिणामी, डिस्कवरी ऑफ इंडिया भारतीय सभ्यतेचा सांस्कृतिक नकाशा उलगडून दाखवतो.

या ग्रंथात नेहरू सामाजिक विषमता, दारिद्र्य, शिक्षणातील असमानता, स्त्रियांचे स्थान आणि जातिव्यवस्थेची चिकित्सा करतात. त्यांच्या दृष्टीने भारताचे स्वातंत्र्य हे फक्त राजकीय मुक्ती नसून समाजाच्या मूलभूत रचनेतील सुधारणा करण्याची प्रक्रिया होती. भारताचे भविष्य विज्ञान, तंत्रज्ञान, आधुनिक विचार आणि सामाजिक न्यायावर आधारित असावे-ही त्यांची स्पष्ट भूमिका या ग्रंथात दिसून येते. त्यांच्या मते भारताची खरी शक्ती त्याची विविधता आणि सहिष्णुता आहे. विविध विचार, धर्म आणि संस्कृती यांचे सहअस्तित्व हा भारताचा अनोखा वैशिष्ट्यपूर्ण वारसा आहे. या विविधतेतूनच भारतीयत्वाची निर्मिती झाली-ही नेहरूंची मध्यवर्ती भूमिका आहे. त्यांच्या नजरेतून भारत पाहताना एक जिवंत, बदलणारा आणि सतत प्रगतिशील समाज दिसतो.

डिस्कवरी ऑफ इंडिया हा केवळ इतिहासग्रंथ नाही; तो राष्ट्रनिर्मितीचा आराखडा आहे. नेहरूंनी भविष्यातील भारताचे चित्रण करताना आधुनिक शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन, औद्योगिकीकरण, नियोजनबद्ध विकास आणि मानवतावादी मूल्ये यांवर भर दिला आहे. पुढे भारताच्या धोरणांमध्ये, विशेषतः पंचवार्षिक योजनांमध्ये, या विचारांचे प्रतिबिंब स्पष्ट दिसते. आजही डिस्कवरी ऑफ इंडिया हा भारताला जाणून घेण्यासाठी अनिवार्य असा ग्रंथ मानला जातो. भारतातील विद्यार्थ्यांपासून ते आंतरराष्ट्रीय इतिहास-अभ्यासकांपर्यंत, अनेकांसाठी हा ग्रंथ भारतीय सभ्यतेच्या अध्ययनाची मूलभूत किल्ली आहे. यातून नेहरूंचे भारतावरील प्रेम, त्यांचा व्यापक दृष्टिकोन आणि भारतीय समाजाच्या उभारणीवरचा ठाम विश्वास जाणवतो. सारांशतः, डिस्कवरी ऑफ इंडिया हा भारताच्या इतिहासाचा केवळ आढावा नाही-तो भारतीय आत्म्याचा शोध आहे, सामाजिक-राजकीय विचारांचे चिंतन आहे, आणि आधुनिक भारताचे स्वप्न कसे असावे याचे दर्शन आहे. हा ग्रंथ आजही तितकाच सुसंगत आहे जितका लिहिला गेला त्या काळात होता.

**– डॉ. भारत कऱ्हाड**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली**
**जिल्हा रत्नागिरी.**

# बिरसा मुंडा : भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील दीपस्तंभ

भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत ज्यांचे योगदान केवळ संघर्षापुरते मर्यादित नसून त्यांनी एका समाजाला, एका संस्कृतीला आणि एका युगाला नवसंजीवनी दिली. त्यात 'धरती आबा' म्हणून ओळखले जाणारे महान क्रांतिकारक, सामाजिक सुधारक व जननायक बिरसा मुंडा हे नाव आदराने उच्चारले जाते. १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील छोटानागपूर पठारातील उलिहातू या छोट्याशा गावात जन्मलेल्या या महान योद्ध्याने केवळ आदिवासींच्या अधिकारांसाठी लढा दिला नाही, तर भारतदेशाच्या स्वातंत्र्यलढ्यातही आपले महत्वपूर्ण योगदान दिले आहे. यंदा आपण त्यांच्या १५०व्या जयंतीचा उत्सव साजरा करीत आहोत. हा केवळ स्मरणाचा क्षण नाही, तर त्यांचा आदर्श, विचार आणि लढ्याच्या परंपरेचा पुनर्जागरण करण्याचा अवसर आहे. बिरसा मुंडा हे ज्या काळात जन्मले, तो काळ भारतावर ब्रिटिशांच्या वर्चस्वाचा होता. ब्रिटिशांनी देशातील जनतेला राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या जखडून ठेवले होते. विशेषतः झारखंड, ओडिशा, बिहार या भागातील आदिवासी समाजावर ब्रिटिश शासन, जमींनदार आणि महाजन त्रिकूटाने अत्याचाराचा डोंगर कोसळवला होता. त्यांच्या जमिनी हिसकावल्या जात होत्या, पिढ्यानपिढ्या शेती करून उपजीविका करणारे हे लोक बेघर होत होते, आणि त्यांना गुलामगिरीच्या गर्ते त ढकलले जात होते. अशा अंधकारमय परिस्थितीत या समाजाच्या हृदयातून एक ज्वाला पेटली होती आणि ती ज्वाला होती बिरसा मुंडांची.

बालपणापासूनच बिरसांना अन्यायाविरुद्ध तीव्र असंतोष होता. त्यांनी आपल्या आजूबाजूच्या समाजात शोषण, दारिद्र्य, निरक्षरता, अंधश्रद्धा आणि धार्मिक फसवणूक पाहिली होती. ब्रिटिश राजवटीत आदिवासींची जमीन सरकारी मालकीची घोषित करून, ती गैरआदिवासी जमीनदार व व्यापाऱ्यांना देण्यात आली होती. या अन्यायाविरुद्ध बिरसांनी आपल्या लोकांना एकत्र केले आणि एक नवे सामाजिक व राजकीय आंदोलन उभारले त्यालाच उलगुलान म्हणजेच महान बंड म्हटले जाते. हे बंड केवळ ब्रिटिशांविरुद्ध नव्हते, तर संपूर्ण अन्यायकारी व्यवस्थेविरुद्ध होते. बिरसा मुंडा यांनी आपल्या विचारांद्वारे आदिवासी समाजात जागृती निर्माण केली. त्यांनी सांगितले की आपली जमीन, आपले जंगल आणि आपले पाणी हेच आपले जीवन आहे. त्यांनी आदिवासींना गुलामीच्या बेड्यातून मुक्त करण्यासाठी शिक्षण, आत्मनिर्भरता आणि संघटनेचे महत्त्व पटवून दिले. धरती आबा म्हणून लोक त्यांना मानू लागले, कारण त्यांनी आपल्या मातृभूमीला माता समजले आणि तिचे रक्षण करणे हेच आपला धर्म मानले. त्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने आपला स्वतंत्र धर्म, संस्कृती आणि ओळख टिकवून ठेवण्यासाठी एक व्यापक चळवळ उभारली होती. १८९९ मध्ये बिरसा मुंडांनी छोटानागपूर प्रदेशात मुंडा आंदोलन उभारले. या आंदोलनाचे घोषवाक्य होते अबुआ दिशुम, अबुआ राज म्हणजे आपली जमीन, आपले राज्य. त्यांनी आपल्या अनुयायांना हिंसाचारापेक्षा आत्मसन्मानाची लढाई लढण्यास प्रेरित केले. ब्रिटिश सरकारच्या शोषणकारी भूमिसुधार कायद्यांविरोधात त्यांनी जमिनींचे रक्षण करण्यासाठी जनतेला संघटित केले. या बंडाने ब्रिटिश सरकार हादरून गेले. बिरसा मुंडा हे केवळ स्थानिक नायक राहिले नाहीत, तर ते भारतातील पहिल्या स्वातंत्र्यवीरांच्या श्रेणीत स्थान मिळवून गेले. १८९५ मध्ये ब्रिटिशांनी त्यांना अटक करून तुरुंगात डांबले, परंतु त्यांची क्रांतीची ज्योत विझली नाही. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी पुन्हा आपल्या अनुयायांना संघटित केले. मात्र, ब्रिटिश सरकारला त्यांचा प्रभाव सहन झाला नाही. १९०० मध्ये त्यांना पुन्हा अटक करण्यात आली आणि ९ जून १९०० रोजी रांचीच्या तुरुंगात त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला. तेव्हा त्यांचे वय फक्त २५ वर्षांचे होते. पण या तरुण क्रांतिकारकाने अल्पायुष्यात केलेले कार्य भारतीय इतिहासात अमर झाले. भारतीय लोकशाहीचा आत्मा म्हणजे समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता होय. बिरसा मुंडा यांनी या तीनही मूल्यांचे बीज आपल्या संघर्षातून रोवले. त्यांच्या प्रेरणेने आज अनेक आदिवासी तरुण शिक्षण, रोजगार आणि राजकारणाच्या



क्षेत्रात पुढे येत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारांनी त्यांच्या नावाने विद्यापीठे, संग्रहालये, स्मारके उभारली आहेत. पण खरी आदरांजली तीच, जेव्हा आपण त्यांच्या विचारांना आपल्या कृतीत उतरवू, शोषणमुक्त समाज, पर्यावरणसंवर्धन, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेची दिशा स्वीकारू. आजच्या काळात, जेव्हा जागतिकीकरणाच्या युगात आदिवासी समाज पुन्हा आर्थिक आणि सांस्कृतिक आव्हानांना सामोरे जात आहे, तेव्हा बिरसा मुंडांचा संदेश पुन्हा नव्याने स्मरणात आणण्याची गरज आहे. त्यांनी सांगितले होते की धरती ही आई आहे, तिचे रक्षण हेच आपला धर्म आहे. हा विचार आज पर्यावरणीय संकटांच्या काळात अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्यांनी दाखवून दिले की खरी प्रगती तीच, जी निसर्गाशी सुसंवाद राखते.

बिरसा मुंडा यांचे जीवन म्हणजे क्रांती, अध्यात्म आणि सामाजिक न्याय यांचा त्रिवेणी संगम होते. त्यांचा संघर्ष हे दाखवतो की एका तरुणाच्या धैर्याने संपूर्ण व्यवस्था हादरवता येते, जर त्याच्या मनात जनतेसाठी प्रेम आणि न्यायाची ज्वाला असेल तर. त्यांनी आपल्या अल्पायुष्यात जे कार्य केले, ते आजही भारतीय समाजासाठी प्रेरणादायी आहे.अखेर, बिरसा मुंडा हे केवळ एक ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व नाहीत, तर ते भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रवाहातील जिवंत प्रतीक आहेत. त्यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आपण त्यांना केवळ स्मरणात ठेवू नये, तर त्यांच्या आदर्शांनुसार वर्तन करावे. कारण बिरसा मुंडा म्हणजे स्वाभिमानाची मूर्ती, अन्यायाविरुद्धच्या संघर्षाचे प्रतीक आणि भारताच्या आत्म्याचा निखळ दीपस्तंभ होते. त्यांचा विचार भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात सदैव दीपस्तंभासारखा उजळत राहील. देशासाठी, समाजासाठी, आणि प्रत्येक त्या माणसासाठी जो न्याय आणि समानतेसाठी झगडत आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

◆ पान १ वरून पुढे...

## जननेता आपल्या...

ढेकनमोहा, जरुड, अशा अनेक गावामध्ये जे बोगस कामे केली जात होती त्याला चाप देऊन अनेक वेळा शासन प्रशासन स्तरावर अनेक आंदोलने केले व बोगसगिरीला आळा घातला व अनेक विकासकामांची ओळख निर्माण केली आहे. कोणताही राजकीय वारसा नसतानाही फक्त परिश्रम, जनसेवा आणि गोरगरिबांच्या मदतीच्या जोरावर त्यांनी खेडो - पाडी जनतेच्या मनात ठसा उमटवला आहे.

## पहिल्या पत्नीच्या...

सोबत दारूही- संदीप्या हा अट्टल गुन्हेगार असल्याने पोलिस त्याचा शोध घेत होते. शुक्रवारी तो शीतलला भेटायला येणार असल्याची माहिती मिळाली. त्याप्रमाणे एलसीबीने गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन फाट्यावर सापळा लावला. संदीप्या आणि त्याचा लहान भाऊ भगवान हे दोघेही एका हॉटेलवर शीतलसाठी जेवणाचे पार्सल घेण्यासाठी आले होते. त्यांनी स्वतःसाठी दारूही घेतली. पोलिस दिसताच त्यांनी पळायला सुरुवात केली. बाजूच्या उसाच्या शेतात पळत असताना संदीप्याला पकडण्यात आले, पण त्याचा भाऊ उसातून फरार झाला. त्यांच्याकडे शस्त्र असण्याची भीती असल्याने पोलिसही सावध होते. संदीप्याला पिंपळनेर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.
पाच गुन्हे उघड आणि मुद्देमाल जप्त- दीप्या हा गोळीबार करून फरार झाला होता. तो कधी खामगाव, तर कधी बेलगाव असा मुक्काम करायचा, पण तरीही तो दिवसा घरफोड्या करत असे. पिंपळनेर पोलिस ठाणे हद्दीत दोन, अंमळनेर, नेकनूर, शिरूर येथे त्याच्याकडून पाच गुन्हे उघड झाले आहेत.

◆ पान १ वरून पुढे...

तसेच साडेचार लाख रुपयांचे सोने-चांदीचे दागिनेही हस्तगत केले आहेत. हा सर्व मुद्देमाल त्याने पहिली बायको मटक हिच्याकडे बेलगावला ठेवला होता. या पथकाने केली कारवाई- स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, स.पो.नि. धनराज जारवाल, उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, हवालदार सोमनाथ गायकवाड, अशोक दुबाले, राहुल शिंदे, बाळू सानप, विकास राठोड, अंकुश वरपे, अशपाक सय्यद, मनोज परजणे, विकी सुरवसे आणि नितीन वडमारे हे पथक कारवाईत सहभागी होते.

## बीडमध्ये वाळू ...

राजकुमार आचार्य (मातकुळी), प्रवीण शिंदे (चिखली), स्नेहल थेटे (खडकत), योगेश गोरे (धानोरा), मंडळ अधिकारी सुभाष गोरे, महसूल सहायक दिलीप गालफाडे आणि महसूल शिपाई कुंदन बावरे यांचा समावेश होता. कर्मचाऱ्यांवर हल्ला- जप्त केलेला मुद्देमाल तहसील कार्यालयाकडे घेऊन येत असताना, आष्टी शहरातील खडकत चौकात फॉरेस्ट ऑफिसजवळ तीन अनोळखी इसम क्रेटा (एमएच ४२ बीई ०७७६) गाडीतून आले आणि त्यांनी महसूल पथकाशी हुज्जत घालून कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की केली. वाळू माफियांनी कर्मचाऱ्यांचा मोबाइल हिसकावून घेतला आणि कर्मचाऱ्यांच्या अंगावर जेसीबी घालून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर शुभम करडुळे व इतरांनी आणखी काही वाहने आणून महसूल पथकाच्या ताब्यातून एक ट्रॅक्टरचे हेड/धुड जबरदस्तीने पळवून नेले. पथकातील तलाठी प्रवीण शिंदे आणि इतरांना चापटांनी व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. या गंभीर घटनेनंतर तलाठी सचिन विठ्ठल तेलंग यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आष्टी पोलिस ठाण्यात वाळू माफियांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

◆ पान १ वरून पुढे...

## पालकांना सावध...

असेल. या वयात अभ्यास, खेळणे आणि दंगा करण्याचे सोडून या विद्यार्थ्यांनी वर्गमित्रावरच अश्लील व्हिडिओ पाहून अनैसर्गिक अत्याचार केल्याचा प्रयत्न केला आहे. या घटनेने पालकही भेदरले असून शाळा प्रशासनातही खळबळ उडाली आहे. गुरुवारी ही घटना उघडकीस आली आहे. लातूर शहराजवळ असलेल्या एका सरकारी शाळेतच ही घटना घडली आहे. तिसरीमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याने सोशल मीडियावर एक अश्लील व्हिडीओ बघितला. शाळेतील वर्गात तो होता. अश्लील व्हिडिओ पाहून त्याने वर्गमित्रावरच अनैसर्गिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. ही घटना जेव्हा शिक्षकांना कळली, तेव्हा तेही हादरून गेले. विद्यार्थ्याची विचारपूस केल्यानंतर त्याने सोशल मीडियावर व्हिडीओ बघितल्याचे आणि ते बघून असे करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. या घटनेने शाळेत खळबळ उडाली. शिक्षक आणि पालकांनीही धक्का बसला आहे.

## मराठा आंदोलक....

दादा गरड आणि अमोल खुणे यांच्याशी कांचन सळवीचा सबंध असल्याचा आणि तो धनंजय मुंडे यांचा पीए असल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला होता. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली होती.

## नवले पुलाच्या....

नवलकर, वय ३७ वर्ष, शांता दत्तात्रय दाभाडे वय ५४ वर्ष, दत्तात्रय चंद्रकांत दाभाडे वय ५८ वर्षे या एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला आहे. तर त्यांच्यासोबत ३ वर्षीची त्यांच्या शेजारी राहणारी मुलगी मोक्षिता हेमकुमार

◆ पान १ वरून पुढे...

रेड्डी होती. ही मुलीग आपल्या आईच्या मैत्रिणीसोबत फिरायला गेली होती. तिने देखील या अपघातात आपले प्राण गमावेल आहे. नवलकर कुटुंबातील व्यक्तीने दिलेल्या माहितीनुसार, स्वाती नवलकर यांच्या वडिलांना पक्षाघाताचा झटका आला होता. यामधून ते सुखरुप वाचावेत आणि चालू लागावेत यासाठी त्यांनी ५ गुरुवार केले होते. अपघात झाला तो शेवटचा पाचवा गुरुवार होता. त्या नारायणपुरवरुन दत्तांचे दर्शन घेऊन घरी परतत होते. त्याच दिवशी त्यांच्या मुलीचा देखील वाढदिवस होता. अशातच त्यांच्या अपघाताचा बातमी समोर आली.

## पत्रकार अनंत...

सुमारास र्हद्य विकाराच्या झटक्याने निधन झाले त्यांच्यावर शुक्रवार रोजी सकाळी दहा वाजता शोकाकुल वातावरणात हिंदू धर्मातील रितीरिवाजानुसार अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी जिल्ह्यातील पत्रकार यांच्यासह विविध क्षेत्रातील पदाधिकारी आणि गांवकरी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. मागील काही महिन्यापूर्वी त्यांना बिपी, शुगर आजाराने ग्रासल्याने त्यांच्यावर बायपास ही शस्त्रक्रिया करण्यात आली त्यानंतर त्यांची ताबेत खालावली होती. काही दिवसापूर्वी ते आजारी पडले आणि आयुष्याशी संघर्ष सुरू होता या काळातच गुरुवार रोजी रात्री अडीच वाजण्याच्या सुमारास त्यांना अस्वस्थ वाटले आणि याच दरम्यान हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांची प्राणज्योत मावळली.त्यांच्या निधनामुळे तलवाडा आणि तलवाडा परिसरातील हळहळ व्यक्त होत असून त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, भाऊ, बहीण असा मोठा परिवार आहे.या दुःखातून सावरण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबाला मिळो अशी अपेक्षा व्यक्त केली जात असून दैनिक मराठवाडा पत्र परिवार कलाल कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## दीड लाखाच्या...

डाके यांचेकडे चौकशी केली असता, त्याने ही बैल जोडी तक्रारदार संपत निपटे राहणार पिंपरखेड, यास पैसे देऊन विकत घेतली, असे सांगितले त्यानंतर पोलिसांनी पुन्हा विश्वासात घेऊन तक्रारदाराची चौकशी केली असता त्यानेच हा बैलचोरीचा खोटा बनाव केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यामुळे सदर तक्रारदार संपत नीपटे व त्यांचे भाऊ मदन निपटे यांचे विरोधात पोलीस ठाणे वडवणी येथे पोलीस अंमलदार नितीन काकडे यांचे सरकारतर्फे फिर्यादीवरून सर्व परिस्थिती माहिती असताना देखील पोलिसांचे कायदेशीर अधिकाराचा गैरवापर करण्यासाठी पोलिसांना खोटी माहिती देवून त्यांची दिशाभूल करने या कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यानंतर पोलिसांनी श्रीकांत मगर शेतकऱ्यास ही बैलजोडी परत केल्याने त्याने त्यांनी व त्यांचे कुटुंबीयांनी वडवणी पोलिसांचे आभार मानले व कोणत्याही नागरिकांनी स्वतःच्या फायद्यासाठी खोट्या तक्रारी दाखल करू नये, असे आवाहन वडवणी पोलिसांनी केले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव अनिल कटके यांचे मार्गदर्शनाखाली वडवणी ठाण्याच्या प्रभारी -झख वर्षा व्हगाडे, पोलीस अंमलदार नितीन काकडे, बिभीशन मुंजाळ, अशोक क्षीरसागर, आशुतोष नाईकवाडे, विलास खरात यांनी केली.

## शिरुर पोलीसांनी...

◆ पान ४ वरून पुढे...

वाळू अनधिकृतपणे वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आले. या संदर्भात पोलीस स्टेशन शिरुर कासार येथे गु.र.नं. ३१४/२०२५ कलम ३०३(२), ३(५) बी.एन.एस. अन्वये ट्रॅक्टर चालक व पाहिजे आरोपी ट्रॅक्टर मालक यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीकडून खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे - महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर किंमत ५,००,०००/-, वाळू किंमत ८,०००/-, एकूण मुद्देमाल किंमत ५,०८,०००/-, ही कारवाई वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर कासार पोलीस ठाणे चे सहा पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, पोह/४८१ ऊबाळे, पोशी २२२१ सतीश बहिरवाळ यांनी केली. सदर कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांना प्रतिबंध लागून अशा प्रकारच्या बेकायदेशीर वाहतुकीवर आळा बसण्यास मदत झाली आहे.

## गुंडगिरी करणाऱ्या....

शहर पोलिसांकडून सुरू आहे. प्राथमिक तपासात असेही उघड झाले आहे की, सदर युवक सोशल मीडियावर गुंडगिरीचे रील्स तयार करून इतरांवर धाक निर्माण करत असे. त्याच्या या कृत्यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. अटक केलेला आरोपी- शेख अरहम उर्फ अरु शेख मक्सुद, वय २० वर्ष रा. खासबाग बीड ता. जि.बीड गुन्हा क्रमांक: पोलीस ठाणे बीड शहर गुरक्र १७९/२०२५, कलम: भारतीय दंड संहिता कलम ३९२, ५०४, ५०६ इ. अन्वये..बीड शहर पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा प्रकारच्या गुंडगिरी वा बेकायदेशीर कृत्यांविरोधात त्वरित पोलिसांना कळवावे. पोलिस प्रशासन अशा गुंड प्रवृत्तींच्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई करत राहील.

◆ पान ४ वरून पुढे...

## निवडणूक आचारसंहितेचे...

नमुना मतपत्रिका छपाईवर निबंध घालणेबाबत. धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध, धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास निबंध घालणे. मोटारगाड्या वाहनांचा ताफ्याचा वापर करण्यास निर्बंध घालण्याबाबत. प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचारांचे कापडी फलक, झेंडे लावणे इ. बाबींसाठी निबंध घालणे, ध्वनीक्षेपकाचे वापराबाबत निबंध सार्वजनिक इमारतीचे ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, रहदारीस अडथळा निर्माण न होवू देण्यासाठी निबंध घालण्याबाबत. खाजगी व्यक्तींच्या जागेवर/सार्वजनिक जागेवर झेंडे, भित्तीपत्रके लावण्यास निर्बंध घालणे, उपरोक्त प्रमाणे आदेशांचे पालन सर्व शासकीय निमशासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व नागरिकांनी करावेअसे आवाहन जिल्हाधिकारी विविक जॉन्सन यांनी केले आहे.

## लोकनेते सुंदररावजी...

करुन शाश्वत विकासाचे मॉडेल निर्माण केले आहे. या सर्व उपक्रमांव्दारे शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ, स्थानिक अर्थव्यवस्थेची मजबुती आणि ग्रामीण भागातील रोजगार निर्मातीस मोठा हातभार लागलेला आहे. सहकार मुल्यांवर आधारीत या प्रगत, पारदर्शक आणि समाजाभिमुख कारखाना व्यवस्थापनाच्या गुणांचा अभ्यास करुन वरील संस्थांनी कारखान्याची ग्रीन वर्ल्ड को. प्राईड-२०२५ या प्रतिष्ठेच्या

◆ पान ४ वरून पुढे...

पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. सदरील पुरस्काराचे वितरण दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी सहकार सभागृह कॉसमॉस को.ऑप. बँक लि, शिवाजीनगर पुणे येथे सन्माननीय केंद्रीय मंत्री व राज्यातील विविध खात्याचे मंत्री यांचे प्रमुख उपस्थितीत होणार आहे. सदरचा प्रतिष्ठेचा पुरस्कार कारखान्यास मिळालेबद्दल सर्व सभासद, संचालक, अधिकारी, कर्मचारी, हितचिंतक यांचे वतीने कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके, मा.श्री. धैर्यशीलकाका सोळंके, चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके, व्हा. चेअरमन श्री. जयसिंगभैय्या सोळंके, कार्यकारी संचालक श्री. आर. सी. बडगुजर यांचे अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.

## जल्लोष लोककलेचा ...

वितरण प्रसिध्द अभिनेत्री तथा बालरंगभूमी परीषदेच्या अध्यक्षा निलम शिर्के सामंत यांच्या हस्ते होणार आहे. बीड जिल्हयातील गेवराई येथील चिंतेश्वर विद्यालय, जिल्हा परीषद माध्यमीक शाळा गेवराई, जिल्हा परीषद प्रा. शाळा जिरेवाडी, द केम्ब्रीज स्कुल गेवराई, आर्ट ऑफ फन, अंबेजोगाई येथील खोलश्वर विद्यालय, बीड येथील संस्कार विद्यालय, चंपावती विद्यालय, शिवाजी विद्यालय, यशवंत विद्यालय, सावरकर विद्यालय, सैनिकी विद्यालय, धुतेकर संगीत विद्यालय, पोदार इंग्लिश स्कुल, स्वराधीश संगीत अकॅडमी, एन.एस.सी. संगीत अकॅडमी त्याचबरोबर, विनायक प्रशाला, संभाजी प्रा.शाळा आदी शाळेच्या बालकलावंतानी समुह लोकनृत्य, समुह लोकगायन, वैयक्तिक लोकगायन आणि लोकवाद्य वादन या कला प्रकारामध्ये सहभाग नोंदवलेला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्यातील महाराष्ट्र दालनाला भेट

## ● स्टॉलधारकांशी संवाद ; उत्पादनांची केली पाहणी

**वृत्तसंस्था**

प्रगती मैदान येथे सुरू असलेल्या ४४व्या भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळाव्यातील महाराष्ट्र दालनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट दिली. भारत व्यापार वृद्धी संस्थे (आयटीपीओ) मार्फत आयोजित या मेळाव्यात महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने 'एक भारत श्रेष्ठ भारत' या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्र दालनाची उभारणी केली आहे. हे दालन १०९८ चौरस मीटर क्षेत्रात पसरलेले असून, त्याची रचना छत्रपती शिवाजी महाराजांच्या वारशावर आधारित आहे. १४ नोव्हेंबरपासून सुरू झालेला हा मेळा २७ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. यावेळी महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अन्बळगन, महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त तथा



सचिव आर. विमला, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विवेक पानसरे, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशाली दिघावकर उपस्थित होते. दालनाचे उद्घाटन सकाळी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झाले. मुख्यमंत्री दवेंद्र फडणवीस यांनी दालनातील महाराष्ट्र राज्य हस्तकला आणि हातमाग महामंडळ, विविध स्वयंसहाय्यता गट, मराठी भाषा दालन, पैठणी कारागीर तसेच इतर स्टॉल्सची पाहणी केली. पैठणी साड्या, कोल्हापुरी चप्पल, चामड्याच्या वस्तू, घरसजावटीच्या वस्तू, हँड पेंटिंग, ऑरगॅनिक उत्पादने, काथ्यापासून बनवलेल्या वस्तू, खादी आणि बांबूच्या वस्तू तसेच बचत गटातील महिलांनी बनवलेले खाद्यपदार्थ आदी वस्तू प्रदर्शित करणाऱ्या स्टॉल्सना त्यांनी भेट दिली. स्टॉलधारकांशी संवाद साधून उत्पादनांची माहिती घेतली. तसेच पैठणी स्टॉलवर महिलांशी चर्चाही केली. राष्ट्रीय राजधानीत राज्याच्या उत्कृष्ट उत्पादनांचे प्रदर्शन करण्यासाठी उद्योग विभागाच्या प्रयत्नांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी कौतुक केले. उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अन्बळगन यांनी मेळा संकल्पना आणि उद्योग विभागाने केलेली कार्यवाही याची माहिती दिली. निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी मेळाव्यात प्रदर्शित विविध उत्पादने व उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. या मेळाव्यात झारखंडला फोकस राज्याचा दर्जा देण्यात आला असून, उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र आणि राजस्थान या चार राज्यांना भागीदार राज्य म्हणून विशेष दर्जा प्राप्त झाला आहे.

# काडीवडगाव जिल्हा परिषद शाळेत बालदिन मोठ्या उत्साहात साजरा

## ● विद्यार्थ्यांच्या ठायी असलेली सर्जनशीलता आणि आत्मविश्वासच उज्वल भवितव्य घडवतणार: मुख्याध्यापक रवींद्र वावळकर

**बीड । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन मोठ्या उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र वावळकर हे होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. बहिरवाळ सर, श्री. बडे सर, अंगणवाडी सेविका श्रीम. जयश्रीताई बादाडे, श्रीम. ललिता वावळकर, श्रीम. कांचन टिळे, श्रीम. जनाबाई मोहन राऊत इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंडित नेहरू यांच्या प्रतिमेचे पुष्प अर्पण करण्यात करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्या नंतर शाळेतील निवडक विद्यार्थ्यांनी नेहरूंच्या बाल प्रेमाबद्दल, शिक्षणाचे महत्त्व, स्वच्छता, पर्यावरण, शाळेतील मूल्य शिक्षण, तसेच आजच्या मुलांवर असलेल्या जबाबदाऱ्या या विषयांवर सुंदर, प्रेरणादायी व प्रभावी विचार मांडले. काही निवडक विद्यार्थ्यांच्या प्रभावी व आत्मविश्वासपूर्ण भाषणांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण मांडणीला उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि पालकांनी उत्स्फूर्त दाद दिली. मुलांच्या वक्तृत्व कौशल्याचे सर्वांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या भाषणानंतर शाळेतील श्री बडे सर व श्री बहिरवाळ सर यांनी आपले विचार मांडले. अध्यक्ष मार्गदर्शन करताना शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र वावळकर यांनी पंडीत नेहरूंचे बालप्रेम, शिक्षणाविषयीचे विचार मांडले विद्यार्थ्यांना बालदिनाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेची भूमिका यावर मार्गदर्शन करताना श्री रवींद्र वावळकर म्हणाले की, आपल्या शाळेतील या गोड विद्यार्थ्यांच्या ठायी असलेले विचार, सर्जनशीलता आणि आत्मविश्वासच त्यांचे उज्ज्वल भवितव्य घडवतील. त्या कामी पालक आणि शिक्षकांचे मोलाचे सहकार्य कायम राहणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अंजली हातागळे व कु. रुंजी बादाडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षकवर्ग, कर्मचारी, तसेच ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

# शालेय गैरव्यवस्थापनाला कंटाळून अध्यक्ष तुषार पाटील यांचा राजीनामा

**कुर्ला । प्रतिनिधी**

शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपद हे सन्मानाचे नाही तर जबाबदारीचे असते. पण प्रामाणिकपणे काम करणाऱ्याला शालेय व्यवस्थापनाकडूनच अडथळे आले, तर पदावर राहण्याचा अर्थ उरत नाही, अशा शब्दांत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, कुर्ला येथील अध्यक्ष तुषार पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत शैक्षणिक व्यवस्थापनातील गंभीर त्रुटींवर प्रकाश टाकला आहे.

पाटील यांनी आपल्या राजीनाम्यात अनेक महत्त्वाच्या बाबी नमूद केल्या आहेत. शालेय पोषण आहाराचे रजिस्टर अपूर्ण असून त्यावर अध्यक्षाची सही घेतली गेलेली नाही, पोषण आहाराचा दर्जा अत्यंत खराब आहे, पोषण आहार पुरवणाऱ्या कामगारांचा करारनामा आजतागायत करण्यात आलेला नाही. शिक्षकांच्या हजेरी पत्रकात चुकीच्या नोंदी आढळतात, तसेच पालक सभांचा अभाव असून पालकांना त्याबाबत माहिती देण्यात येत नाही, असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे.

आरटीई २००९ (Right to Education -Act 2009) नुसार शाळेचे कामकाज पारदर्शकतेने आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी पार पाडले जावे, यासाठी मी आग्रही होतो. परंतु



प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही, ही चिंताजनक बाब आहे, असे पाटील यांनी आपल्या पत्रात लिहिले आहे.गेल्या वर्षभरात त्यांनी आणि त्यांच्या समितीने शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक कामे केली. शाळेत वीजपुरवठा जोडून घेणे, वॉटर फिल्टर बसवणे, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी शौचालय सुविधा निर्माण करणे, २४ तास विजेसाठी इन्व्हर्टर व बॅटरी बसवणे, बायोमेट्रिक व सीसीटीव्ही बसवणे, खिडक्या, किचन व टीव्ही दुरुस्ती, शाळेची स्वच्छता आणि वृक्षारोपण – या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली. तरीदेखील व्यवस्थापनातील सुधारणा न झाल्याने आणि नियमबाह्य गोष्टींवर कारवाई न झाल्याने त्यांनी अखेर नैतिक भूमिकेतून पद सोडले. अशा अनियमितेमुळेच जिल्हा परिषद शाळांची अवस्था बिकट होत चालली आहे. स्थानिक स्तरावर त्यांच्या राजीनाम्यामुळे चर्चा रंगली असून, प्रामाणिकपणे काम करणाऱ्याला साथ नाही – हीच आजच्या शिक्षणव्यवस्थेची शोकांतिका, अशी भावना पालकवर्ग आणि ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करून शाळेतील व्यवस्थापनात सुधारणा कराव्यात, अशी मागणी पालकांनी केली आहे.

# रायगड जिल्हा परिषद शाळा वडगाव येथे बालदिन साजरा ; प्रत्येक विद्यार्थ्यांना ओवाळून स्वागत

**रायगड । प्रतिनिधी**

वडगाव शाळेत बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येक विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मा.राजश्री जांभुळकर व पदवीधर शिक्षिका मयुरी धायगुडे व मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी औक्षण करून पुष्प देत तोंड गोड करून स्वागत केले.भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंती निमित्त शाळेतील विद्यार्थी विविध वेशभूषा करून आजच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते.ज्यात कु.समर्थ गणेश मुंढे इयत्ता पाचवी हा चाचा नेहरू होता,तर नक्ष जाधव सहावी हा पुष्पा,पाचवी चा नक्ष भूत,प्रेम गडगे वारकरी,श्रेयस व देवराज यांनी स्पायडरमॅन तर सुप्रिया पवार कोळीण अशा विविध वेशभूषा व नृत्याने आजचा बालदिन



आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा झाला. यावेळी मुलांना मिष्टान्न भोजन देण्यात आले. विद्यार्थ्यांची भाषणे,गाणी व काही मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा राजश्री जाधव, मुख्याध्यापक सुभाष राठोड, पदवीधर शिक्षिका मयुरी धायगुडे, स्वयं सेवक संकेत काठोळे,संचिता गडगे,अंगणवाडी सेविका नीता राऊत आदींसह पालक उपस्थित होते.

**● वर्षभर मुले अभ्यासच करत असतात पण काहीतरी वेगळं करण्यासाठी बालदिनाच्या औचित्याने वेशभूषेचे उपक्रम घेण्यात आले. मुलांचा उदंड प्रतिसाद लाभला. – सुभाष राठोड मुख्याध्यापक**

# लिंबागणेश जिल्हा परिषद शाळेत बालदिन उत्साहात साजरा

## पंडित जवाहरलाल नेहरू जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १४ नोव्हेंबर रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुलांवरील नेहरूजींच्या अपार प्रेमाचा वारसा जपण्यासाठी दरवर्षी हा दिवस देशभरात बालदिन म्हणून साजरा केला जातो, याची माहिती प्रास्ताविकात देण्यात आली.



कार्यक्रमातील वक्त्यांनी नेहरूजींच्या विचारांवर भाष्य करताना सांगितले की, आजची मुले म्हणजे उद्याचा भारत हे नेहरूजींचे मौलिक विचार आजही तितकेच प्रेरणादायी आहेत. प्रत्येक मुलामध्ये अपार कल्पनाशक्ती, क्षमता आणि देश घडवण्याची ताकद दडलेली असते, यावर त्यांनी विशेष भर दिला होता. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, आरोग्य आणि संरक्षण यांसाठी नेहरूजींनी राबवलेल्या उपक्रमांची आठवणही यावेळी करून देण्यात आली.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेली पंडित नेहरूंच्या वेशभूषेची नक्कल. नेहरू टोपी, गुलाब फुल आणि त्यांच्या अद्वितीय शैलीसह लहान मुलांनी केलेल्या भूमिकांनी वातावरण भारावून गेले आणि उपस्थितांकडून दाद मिळवली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रभारी केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक श्री. दीपक घाटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार हरिओम क्षीरसागर उपस्थित होते. तसेच सहशिक्षिका श्रीमती सुवर्णा गीते यांचीही लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती सुवर्णा अयाचित यांनी केले, तर आभारप्रदर्शन श्रीमती ज्योती सानप यांनी केले.


### जाहीर प्रगटन

**DISTRICT CONSUMER DISPUTES REDRESSAL COMMSSION BEED**
Under the Consumer Protection Act, 2019
CONSUMER CASE NO. DC/470/CC/719/2024
WITH
Petitioner / Appellant - SUBHASH S/O. BALIRAM YADAV
Versus
Opposite Party / Respondent Name: - DNYANRADHA MULTISTATE CO-OP, CREDIT SOCIETY LTD.
To.
Opposite Party / Respondent(s)
1. DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. R/O. HEAD BRANCH-DNYANRADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED, TQ. BEED., MAHARASHTRA BEED. 2. CHAIRMAN, DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. THROUGH SURESH S/O. DNYANOBA KUTE. R/O. HEAD BRANCH-DNYANRADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED, TQ. BEED., MAHARASHTRA BEED. 3. VICE-CHAIRMAN, DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. THROUGH YASHVANT S/O. VASANTRAO KULKARNI. R/O. HEAD BRANCH- DNYANRADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED, TQ. BEED., MAHARASHTRA BEED. 4. BRANCH MANAGER, DNYANRADHA MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BRANCH-NANDURGHAT, TQ. KAIJ., MAHARASHTRA BEED-

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २२/१२/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत.जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.
मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.
दिनांक – ११/११/२०२५
ठिकाण – बीड
शिक्का
(स्वाक्षरीत)
प्रबंधक जिल्हा ग्राहक तक्रार, निवारण आयोग, बीड.

### जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
दिनांक ३०.१०.२०२५
दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–
प्रती,
१ पोलीस निरीक्षक, पो.स्टे चकलांबा
२. ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी
विषयः जन्म नोंद आदेश मिळणे बाबत.
संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जग्रनो२५२५/ ईऑ९९११८१)/ प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
२. अर्जदार सुधाकर सखाराम कहे रा. महारटाकळी यांचा अर्ज दिनांक २७.१०.२०२५
उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार सुधाकर सखाराम कहे रा.महारटाकळी ता. गेवराई यांनी अर्ज देवून अर्जदार यांची मूलगी राजकन्या सुधाकर कर्हे यांचा जन्म दिनांक १३.०७.२०२४ रोजी महारटाकळी येथे झाला असून अर्जदार यास कायदयाचे ज्ञान नसल्यामूळे जन्म नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयास संदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.
करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५/ ईऑ९९११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्माचे ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी महारटाकळी यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी / पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.
शिक्का
(स्वाक्षरीत)
तालुका दंडाधिकारी, गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बदल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ९०२/२०२५
अलका कांतीलाल सौंदरमल विरूध्द – निरंक
ज्याअर्थी मयत नामे कांतीलाल गणपत सौंदरमल हे दिनांक १४.०७.२०२३ रोजी गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार– १. अलका कांतीलाल सौंदरमल वय ४८ वर्षे धंदा –घरकाम, रा. भिमनगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड, २. विशाल कांतीलाल सौंदरमल, वय ३८ वर्षे धंदा नौकरी, भिमनगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड, ३. विकास कांतीलाल सौंदरमल, वय ३६ वर्षे धंदा नौकरी रा. भिमनगर, गेवराई.
शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.
त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणं असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असंही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व गैरअर्जदार यांना सदर भरत नाम कांतीलाल गणपत सौंदरमल रा. भिमनगर, ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीखः १६.१२.२०२५
(मार्फत– ॲड. एस. बी. भंडारी)
(स्वाक्षरीत) क.लिपीक
शिक्का
आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बदल जाहीर घोषणा

**मा.माणिकराव आर सातव साहेब ७ वे सह–दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १५५६/२०२५
आशा व इतर वि. निरंक
ज्याअर्थी मयत नामे देवईबाई भ्र. हरी निर्मळ रा. नेकनूर, ता.जि.बीड ह्या दिनांक ०४–१०– २०२४ रोजी मौजे नेकनूर, ता. जि. बीड येथे मयत झाल्या आहेत.
अर्जदारः– १) आशा भ्र. दशरथ निर्मळ, वय ५५ वर्षे, धंदा–घरकाम. रा.नेकनूर. ता. जि. बीड, २) अनंता पि. दशरथ निर्मळ. वय–३६ वर्षे, धंदा–मजुरी, रा.वरील प्रमाणे, ३) परमेश्वर पि. दशरथ निर्मळ, वय–३४ वर्षे, धंदा– मजुरी. रा. वरील प्रमाणे. ४) माया पि. दशरथ निर्मळ, वय २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे
शासकीय निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.
त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदर मयताचे कायदेशीर वारस नव्हेत. असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्का लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे देवईबाई भ्र.हरी निर्मळ, रा. नेकनूर, ता.जि. बीड यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दि.०३/११/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारिख– १२–१२–२०२५
(ॲड.एस.बी.शिंदे यांच्या मार्फत)
(स्वाक्षरीत) क.लिपीक
शिक्का
आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : १६८०/२०२५
अर्जदार : १. शोभा कचरु मत्रे, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. लक्ष्मी निवास, धांडे गल्ली, तेरवी लाईन, बीड, ता.जि.बीड, २.अमृता मुकुंद भोसले, वय – ३१ वर्षे, धंदा – घरकाम, रा. धांडे गल्ली, बीड, ता.जि.बीड, ३. सुरेखा गणेश मत्रे, वय – ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. धांडे गल्ली, तेरवी लाईन, बीड, ता.जि.बीड, ४. ओम गणेश मत्रे, वय – १९ वर्षे, धंदा – शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, ५.हर्षदा गणेश मत्रे, वय – २० वर्षे, धंदा – शिक्षण, रा. वरीलप्रमाणे,
विरुध्द निरंक
प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.
ज्याअर्थी मयत नामे कचरु विश्वनाथ मत्रे हे दिनांक २८/१२/२०१७ रोजी बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क २ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. अर्जदार क ३ ही मयताची सुन म्हणजे मयताचा मयत मुलगा गणेश कचरु मत्रे याची पत्नी आहे. अर्जदार क ४ व ५ ही अर्जदार क ३ व मयत गणेश यांची अपत्ये आहेत.
अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.
अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.
त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.
आज दिनांकः १०/११/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील तारीखः– २०/१२/२०२५.
(मार्फत विधिज्ञः– ॲड महादेव धांडे)
(स्वाक्षरीत) क.लिपीक
शिक्का
आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १६२१/२०२५
मुक्ताबाई वि. निरंक
ज्यापेक्षा आश्रुबा जिजाबा सांगळे हे दिनांक २०/०३/२००९ रोजी पोखरी, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार– १.मुक्ताबाई भ्र. आश्रुबा सांगळे, वय ८२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. पोखरी, पो. लिंबागणेश, ता. जि. बीड, २.बाबा पि. आश्रुबा सांगळे, वय ६० वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे, ३. शहादेव पि. आश्रुबा सांगळे, वय ५७ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे, ४. लक्ष्मण पि. आश्रुबा सांगळे, वय ५१ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे
अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार नं. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई, वडिल यापुर्वीच मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.
ज्या अर्थी मयत आश्रुबा सांगळे सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन् असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहु मयत नामे आश्रुबा जिजाबा सांगळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख २१/११/२०२५ ही आहे. आज दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.(ॲड. डी. डी. मस्के यांच्यामार्फत) आदेशावरून
(स्वाक्षरीत) क.लिपीक
शिक्का
(स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. १५ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

## थोडक्यात...

### पिंपळनेरात साथीच्या आजाराने नागरिक हैराण

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेर सह परिसरात बहुतांश गावांमध्ये सध्या ताप, खोकला, घसा दुखी, सर्दी अशा प्रकारच्या सदृश साथीच्या आजारांनी थैमान घातले आहे. तालुक्यातील सर्वच गावांमध्ये घराघरात आजारी माणसं आढळून येत आहेत. यामुळे शहरातील खासगी दवाखाने हाउसफुल झाले आहेत. तर शासकीय रुग्णालय ही रुग्णांनी भरू लागली आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. प्रशासनाने तातडीने घरोघरी जाऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जनतेमधून केली जात आहे. पिंपळनेर शहरात दिवसा कडक ऊन व रात्री कडाक्याची थंडी पडते. यामुळे ताप, थंडी, सर्दीचे रुग्ण वाढल्याची शक्यता आहे. ग्रामीण भागासह शहरातही साथीच्या आजाराची लागण वेगाने होत असून नागरिक चिंतेत आहेत. पिंपळनेरसह गावागावांत नाले, गटारी तुंबलेल्या आहेत. अनेक गावामध्ये स्वच्छतेकडे पूर्णतः दुर्लक्ष झाले आहे. अनेक ग्रामपंचायतींचा स्वच्छता कारभार ढिसाळ असल्याचे चित्र आहे. रोगराई वाढत असतानाही प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत आहे. तरी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.अशी जनतेतून मागणी होत आहे .

### संत भगवानबाब ऊसतोड कामगारांच्या मुलींचे शासकीय वसतीगृह गेवराई करीता इमारत भाडेतत्वावर देण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ पुणे अंतर्गत चालविण्यात येणा-या संत भगवानबाबा ऊसतोड कामगारांच्या मुलीचे शासकीय वसतीगृह, गेवराई तालुक्याच्या हद्दीमध्ये १०० विदयार्थीनींकरीता निवासाची सोय असलेली सर्व सोयी-सुविधांनी युक्त अशी १०००० स्क्वेअर फुट इमारत, सदर इमारतीत पर्याप्त निवासखोल्या, भोजनगृह, कार्यालय, भांडारगृह, चौकीदार निवासस्थान, स्नानगृहे, शौचालय, संरक्षण भिंत उपलब्ध असणारी इमारत भाडेतत्वावर घ्यावयाची असून अशी इमारत उपलब्ध असल्यास इमारत भाडेतत्वावर देण्याकरीता संबंधित इच्छुक इमारत मालक यांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, नगर रोड बीड अथवा मागासवर्गीय मुलीचे शासकीय वसतीगृह, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर रोड, बीड या कार्यालयांशी दि.३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा, असे संत भागवानबाबा उसतोड कामगार, मुलींचे शासकीय वसतीगृहाचे गृहपाल यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### जिल्हा कृती दलाची बैठक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षते खाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती संभागृहात जिल्हा कृती दलाची बैठक संपन्न. या बैठकीत जिल्हा महिला व बालविकास अधिकारी एफ. एम. शेख व परीविक्षा अधिकारी मंगेश जाधव आणि चाइल्ड समन्वयक अश्विनी जगताप यांनी माहे एप्रिल २०२५ ते नोव्हेंबर २०२५ काळात थांबवलेले १५१ बालविवाहची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली. बालकल्याण समिती अध्यक्ष अशोक तांगडे सदस्य संतोष वारे,सुरेश राजहंस यांनी त्याच्या कडील बालविवाहाच्या प्रकरणाचा आढावा प्रस्ताविकाव्दारे सादर केला. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की ३ जानेवारी २०२६ रोजी संपूर्ण जिल्हयातील शाळेत स्त्री मुक्ती दिना निमित्त रॅलीचे आयोजन करून जास्तीत जास्त बालिकाचा सहभाग नोंदवणे व बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञा घेणे, गावात झालेल्या बालविवाहचा पाठपुरावा संबधीत ग्रामसेवकांनी करावा आणि तसा अहवाल महिला व बालविकास चाइल्ड लाइन कडे पाठवावा तसेच गट-शिक्षणाधिकारी सी.डी.पी.ओ यांच्या मार्फत पुढील महिन्यात बाल दिन, पथनाट्या, दवंडी, देणे अशा विविध कार्यक्रमाद्वारे बालविवाहाचे दुष्परिणाम या विषयावर कार्यक्रम आयोजित करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या. असे कोणतेही प्रकरण आढळले तर १०९८ या क्रमांक वर संपर्क साधवा.

# यशस्वी होण्यासाठी जिद्द महत्त्वाची: रणवीर पंडित

## शिवाजीनगर बी. फार्मसी महाविद्यालयात फ्रेशर्स दिन आनंदात साजरा

**गेवराई । प्रतिनिधी**

कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी जिद्द महत्त्वाची आहे, मनात जिद्द ठेऊन वाटचाल केली तर यश आपल्याकडे येते, तेव्हा विद्यार्थ्यांनी जिद्द ठेऊन वाटचाल करावी व यशस्वी व्हावे असे आवाहन शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. शिवाजीनगर गढी येथील कॉलेज ऑफ बी. फार्मसी अँड रिसर्च सेंटर येथे विद्यार्थ्यांकरिता फ्रेशर्स दिन आयोजित करण्यात आला होता, यांवेळी ते बोलत होते.

जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ बी. फार्मसी अँड रिसर्च सेंटर, शिवाजी नगर, गढी. येथे प्रथम वर्ष विद्यार्थ्याकरिता द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी फ्रेशर्स दिनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, बाजार समितीचे उपसभापती



श्रीराम पवार, शिवशारदा पब्लिक स्कूलचे प्राचार्य संतोष कुमार अन्नम. यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना रणवीर पंडित म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वर्तमान काळातील शिक्षण क्षेत्रात असलेल्या स्पर्धे चा आणि त्याकरता आवश्यक असलेली जिद्द आत्मसात करून सामोरे जावे, तसेच आज दैनंदिन शिक्षणासह उत्तम आरोग्यासाठी खेळातही सहभाग आवश्यक आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांनी विविध खेळामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. राख एम.एस., प्रा. बदरे ए.ए., प्रा.देशमुख आर.बी., प्रा.शेख एम.आय., प्रा.गोयकर एम.बी., प्रा.धुमाळ एम.डी., प्रा.देशमुख एस.व्ही, प्रा.गायकवाड व्ही. एस., प्रा.गायकवाड वाय.एम. यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी पवार एस.जी., मोटे जी.आर., शिंदे आर.आर., शिंदे आर. आर., नाटकर आर.ई.,माने वाय.डी., काळे ए.एस., पवार पी.आर., शिंदे पी.बी., मडिकर ओ.एस. यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दीड लाखाच्या बैलचोरीचा बनाव अंगलट

## तक्रारदारच बनला आरोपी; वडवणी पोलिसांची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक,नवनीत कॉंवत यांनी बीड जिल्ह्यात पदभार घेतल्यापासून खोट्या तक्रारीचे प्रमाण बहुतांश कमी झालेले आहे, कारण यापूर्वी खोट्या तक्रारी देणाऱ्या तक्रारदारावर जिल्ह्यात गुन्हे झालेले आहेत. परंतु पुन्हा एकदा असा प्रकार वडवणी पोलीस ठाण्यात घडला. दिनांक १३/ ११/ २०२५ रोजी संपत त्रिंबक निपटे,व त्यांचे भाऊ त्रिंबक नीपटे राहणार पिंपरखेड यांनी वडवणी पोलीस ठाणे येथे त्यांचे स्वतःचे दीड लाखाची



बैल जोडी पंधरा दिवसांपूर्वी चोरी गेल्याची माहिती वडवणी पोलीस ठाण्याच्या -ठि वर्षा व्हगाडे यांना दिली. इतके दिवस तुम्ही तक्रार देण्यासाठी का आला नाही? तसेच तुमच्या बैलजोडी संदर्भात काही आर्थिक व्यवहार आहे का? अशी व्हगाडे यांनी वारंवार विचारणा करूनही तक्रारदार आपल्या मतावर ठाम होते, त्यानंतर पोलिसांनी सदर बैलजोडी संदर्भात तपासाची चक्रे फिरविली. त्यात सदर बैलजोडी ही श्रीकांत चंद्रकांत मगर, राहणार भावठाणा , तालुका आंबेजोगाई,बीड या शेतकऱ्याकडे असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पोलिसांनी त्यास समक्ष पोलीस ठाणे येथे बैल जोडीसह आणले असता त्याने ही जोडी बाबाराव डाके, राहणार टकारवाडी, तालुका माजलगाव, याचे कडून विकत घेतल्याचे सांगितले, त्यानंतर पोलिसांनी मध्यरात्री टकारवाडी,येथे जावून बाबाराव ▶ उर्वरित पान २ वर

# शिरुर पोलीसांनी वाळूने भरलेला ट्रॅक्टर पकडला



**शिरूर । प्रतिनिधी**

पोलीस पथकाने पौडूळ फाट्यावर सापळा लावला असता, एक लाल रंगाचा महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर वाळूने भरलेला दिसून आला. त्याचा पाठलाग करून तो ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आला. चौकशीत सदर ट्रॅक्टर चालकाचे नाव भाऊसाहेब विश्वंभर काशीद असे असून, ▶ उर्वरित पान २ वर

# गेवराई तालुक्यातील कुषी विभातील शेतकऱ्यांची लुट थांबवा : अखिल भारतीय मराठा महासंघ

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील सिरसदेवी गडी मादळमोही, बरेच गावातील शेतकरी यांना शेती अवजारे महा डी पी टी योजना अंतर्गत कुर्षी क्षेत्रातील, औजारे ट्रॅक्टर ठिबक पावर टिलर पावर विडर चाफ कटर रोटावेटर, लॉटरी प्रमाणे लागलेले अवजारे खरेदीसाठी गावातील शेतकऱ्याला काही अधिकारी दुकानदाराची सहमत करून चीरी मेरी घेऊन त्या दुकानदाराची



कोटेशन घेऊन अपलोड करायला होता दुसरीकडे कोटीशन असले त्रुटी काढून त्या शेतकऱ्याला बेजार करून टाकतात नाईलाजाने शेतकऱ्याला अधिकाऱ्यांनी सांगितल्याप्रमाणे तेच कोटीशन खरेदी करायला लावतात जर बघितलं तर शेतकऱ्याबरोबर शासनाची भरपूर लुट चालू केली आहे तरी गेवराई तालुक्यातील सगळ्या अवजाराची परत पाणी अहवाल करून दोषी अधिकारी आढळलं निलंबित करून योग्य ती कारवाई करण्यात यावी नसता अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल बीड जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंके यांनी पत्रके द्वारे केले आहे.

# गुंडगिरी करणाऱ्या युवकास बीड शहर पोलिसांची अटक



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर परिसरात गुंडगिरी करून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका युवकास बीड शहर पोलिसांनी अटक केली आहे. सदर युवकाने फिर्यादीस मारहाण करून त्याच्याकडून जबरदस्तीने पैसे काढून घेतले होते. या प्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात जबरदस्ती चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी गेल्या दोन महिन्यांपासून फरार होता. बीड शहर पोलिसांनी या प्रकरणाची कसून चौकशी करून, मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर युवकास अटक केली आहे. तपासादरम्यान आरोपीकडून जबरदस्तीने घेतलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, पुढील तपास बीड ▶ उर्वरित पान २ वर

# निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे : जिल्हाधिकारी विविक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन यांनी राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतीमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम- २०२५ दिनांक ०४.११.२०२५ रोजी घोषित केला असून बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूका कार्यक्रमात समाविष्ट आहेत. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहीता अंमलात




आलेली आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिषदाच्या निवडणूका शांततेत व खुल्या वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली दि.४ नोव्हेंबर ला निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची बैठक घेऊन मार्गदर्शन केलेले आहे.

त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख यांची बैठक दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात येऊन सदर बैठकीत आदर्श आचार संहितेचे पालन करणे व प्रभावीपणे अंमलबजावणी करणे बाबत तसेच कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणे बाबत आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिदांच्या सार्वत्रिक निवडणुका शांततेत व खुल्या वातावरणात पार पाडण्यासाठी खालील मुद्यांच्या अनुषंगाने आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. शासकीय/ निमशासकीय कार्यालये/ विश्रामगृहे इ. परिसरात मिरवणुका काढणे, घोषणा देणे व सभा घेणे इ. बाबींबाबत निर्बंध, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंधक कायद्याअंतर्गत कार्यवाही करणे. उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल करतेवेळी अवलंब करण्याची कार्यपद्धती. ▶ उर्वरित पान २ वर

# लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास 'ग्रीन वर्ल्ड को. प्राईड-2025' पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास ग्रीन वर्ल्ड को प्राईड २०२५ चा प्रतिष्ठेचा व मानाचा पुरस्कार जाहीर झाला.याबद्दल कारखाना चेअरमन, व्हा.चेअरमन, कार्यकारी संचालकांसह कारखाना प्रशासनावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वर्ल्ड व कॉसमॉस को. ऑपरेटिव्ह बँक लि. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार



क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या संस्था,व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.त्याप्रमाणे या वर्षीचा जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्यल दिला जाणारा ग्रीन वर्ल्ड को. प्राईड-२०२५ हा पुरस्कार तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर कारखान्यास नुकताच घोषीत झाला.तसे पत्र ग्रीन वर्ल्ड पब्लीकेशनच्या वतीने सोळंके कारखान्यास कळविले असल्याची माहिती चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके यांनी दिली. ते म्हणाले की, लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादक सभासदांच्या आर्थिक हिताचे रक्षण करताना ऊसाला दिलेला यथोचित व स्पर्धात्मक दर, साखर उत्पादनातील गुणवत्ता, उत्पादन खर्चातील सुव्यवस्था आणि कारखाना व्यवस्थापनातील पारदर्शकता यांचा उत्तम संगम साधला आहे. त्याचबरोबर कारखान्याच्या व्यापक विकासासाठी इथेनॉल उत्पादन, को. जनरेशन प्रकल्प (बिज उत्पादन), प्रेसमड व बायो फर्टीलायझर उत्पादन, डिस्टिलरी, कचरा व्यवस्थापन, बायोगॅस प्रकल्प यातील काही जोड व्यवसायांचे यशस्वीपणे संचालन ▶ उर्वरित पान २ वर

### जल्लोष लोककलेचा आज अभिनेत्री निलम शिर्के सामंत यांच्या हस्ते पारितोषीक वितरण



**बीड । प्रतिनिधी**

बालरंगभूमी परिषद मुंबई आयोजित जल्लोष लोककलेचा , चला उधळूया लोकरंग गायन -वादन, नृत्य असे उपक्रम बीड शाखेतर्फे १५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजेपासून सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान महाविद्यालयाच्या परिसरामध्ये होणार आहे. या महोत्सवाचे पारितोषीक ▶ उर्वरित पान २ वर




# निवडणूक काळात गोंधळ करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर; गोंधळ घातल्यास कठोर कारवाई करण्यात येईल

**बीड । प्रतिनिधी**

नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीस सर्वसामान्य नागरिक, शांतता समिती सदस्य आणि निवडणूक उमेदवार उपस्थित होते. शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा आढावा घेवून निवडणूक काळातील अडचणींची माहिती पोलिस प्रशासनाने सहभागी नागरिकांसोबत सामायिक केली.

बैठकीदरम्यान बीड उपविभागीय पोलिस अधिकारी पूजा पवार यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शहरात संध्याकाळच्या गस्तीची शृंखला अधिक कडक स्वरूपात राबवण्यात येईल.

निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्या किंवा गोंधळ घालणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. निवडणूक काळात जास्तीत जास्त पोलिस बंदोबस्त आणि मनुष्यबळ तैनात केले जाईल. नागरिकांनी संयम पाळून पोलिस प्रशासनास सहकार्य करावे, कुणालाही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि निवडणूक पूर्णपणे शांततेत पार पाडावी, असे आवाहन या वेळी करण्यात आले. याचबरोबर पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत यांनी तक्रारी नोंदविण्यासाठी उपलब्ध केलेले ठठ कोड, हेल्पलाईन नंबर, विविध डिजिटल प्लॅटफॉर्म याबद्दल नागरिकांना माहिती देण्यात आली. प्राप्त तक्रारींवर तातडीने कारवाई केली जाईल, असेही सांगण्यात आले.

या कालावधीत सोशल मीडियावरही कडक लक्ष ठेवण्यात येणार आहे. भडकावू पोस्ट, अफवा किंवा नियमबाह्य सामग्री प्रसारित करणाऱ्यांविरुद्ध त्वरित गुन्हा दाखल करून अटक करण्यात येईल, असा इशाराही पोलिसांनी दिला. निवडणूक प्रक्रिया शांत, पारदर्शक आणि सुरक्षीत वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत यांच्या वतीने उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांनी केले.